# अलंकारशास्त्र

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे '*' या चिन्हाने दर्शवले आहेत.)


- मनोगत ८
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य १०
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ११
- आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ १४
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय १५
- अलंकार विकत घेतांना घ्यावयाची काळजी १७

१. 'अलंकार' या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ १९
२. अलंकाराचे काही समानार्थी शब्द १९
३. अलंकारांची निर्मिती १९
४. ईश्वरी गुण म्हणजे सूक्ष्मातील अलंकार २०
५. वैराग्यरूपी अलंकार (ब्रह्मदर्शक गुणस्वरूपी अलंकारिता) २२
६. ब्रह्मांडाचा अलंकार : शिवध्यान २२
७. देवता, मनुष्य आणि अलंकार २३
    * काही अलंकार, त्यांच्यातील कार्यरत तत्त्व आणि संबंधित देवता २७
    * देवतांचे अलंकार आणि त्यांचा मनुष्याला होऊ शकणारा उपयोग २८
८. युगांनुसार अलंकारांत होत गेलेले पालट (बदल) ३०
९. अलंकारांची वैशिष्ट्ये ३२
१०. अलंकारांचा वापर करण्यामागील उद्देश आणि महत्त्व ३३
    * अलंकार परिधान केल्याने देवतांच्या लहरी ग्रहण करता येणे ३५
    * औक्षणात अलंकार वापरण्याचे महत्त्व ३७

* देवीला अर्पण केलेले अलंकार परिधान केल्यास त्या अलंकारांतील देवीची शक्ती आणि चैतन्य मिळणे ३७
* अलंकारांमुळे वाईट शक्तींपासून रक्षण होणे ४१
११. अलंकाराचे धातू आणि त्यात जडवलेली रत्ने ५०
* दागिन्यांत जडवलेल्या रत्नांचा शरिरावर चांगला परिणाम होणे ५५
१२. कोणी कोणते अलंकार परिधान करावेत ? ५७
१३. व्यक्तीमत्त्वानुसार अलंकारांची निवड ५८
१४. स्त्रियांचे अलंकार : स्त्रियांनी अलंकार परिधान करण्याचे महत्त्व ५८
१५. पुरुषांचे अलंकार : पुरुष हे वैराग्यरूपी शिवतत्त्वाचे दर्शक असल्याने आणि अलंकार आकर्षणाचे प्रतीक असल्याने पुरुष सर्वसाधारणतः अलंकार घालत नसणे ६३
१६. स्त्री आणि पुरुष यांचे अलंकार ६५
* साखळी : असात्त्विक आणि सात्त्विक वेलवीण (नक्षी) असलेली सोन्याची साखळी घालून केलेले सूक्ष्मातील प्रयोग ६५
* अंगठी : विविध चिन्हांकित अंगठ्यांमधून मिळणाऱ्या चैतन्याचे प्रमाण ६८
* पुरुषांनी उजव्या हाताच्या, तर स्त्रियांनी डाव्या हाताच्या अनामिकेत अंगठी घालणे योग्य ७१
* हातात 'फ्रेंडशिप बँड' (रंगीत कापडाचा पट्टा) बांधण्यापेक्षा स्त्रियांनी बांगड्या आणि पुरुषांनी सोने, चांदी किंवा तांबे यांचे कडे घालणे ७७
१७. लहान मुलांचे अलंकार : डूल आणि कडी ८१
१८.अलंकारांची आवश्यकता आणि अनावश्यकता ८२
* 'साधना' हाच मानवाचा खरा अलंकार ! ८३
* साधना करतांना सूक्ष्मातून आनंद मिळत असतांना स्थुलातून अलंकार परिधान करण्याची इच्छा न उरणे ८४
* भाव असल्यास अलंकारांची आवश्यकता नसणे ८४
* उन्नतांनी अलंकार धारण करण्याची अनावश्यकता ८५
१९. सात्त्विक आणि असात्त्विक अलंकार ८५
* सात्त्विक अन् असात्त्विक अलंकारांचा शरीर आणि मन यांवर होणारा परिणाम ८५

*सात्त्विक अन् असात्त्विक अलंकारांच्या संदर्भातील सूक्ष्मातील प्रयोग ८६
* अलंकारांतील सात्त्विकता टिकवून ठेवण्यासाठी साधना आवश्यक ८९
२०. विविध प्रकारच्या मांत्रिकांनी अलंकारांवर केलेल्या आक्रमणांची लक्षणे ८९
२१. अलंकारांची शुद्धी ९०
२१ अ. स्थुलातील शुद्धी – अलंकार रिठ्याच्या पाण्यात बुडवून ठेवणे ९०
२१ आ. सूक्ष्मातील शुद्धी ९०
२१ इ. अग्नीशुद्धी ९९
२२. अलंकारांची मर्यादा ९९
* मांत्रिकांनी सिद्धींच्या बळावर अलंकारांवर काळ्या शक्तीचे आवरण आणून त्यांची कार्य करण्याची क्षमता घटवणे ९९

## मनोगत

नऊवारी साडी, कपाळावर कुंकू आणि जोडीला अलंकारांचा साज, ही हिंदु स्त्रीची पारंपरिक ओळख आहे. अलंकार हा हिंदु संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. हा वारसा गेल्या कित्येक पिढ्या अभिमानाने जपला गेला. स्काळ पालटला, तशी हिंदु संस्कृतीवर पाश्चात्त्य संस्कृतीची पुटे चढली. अलंकाररूपी वारशाकडे दुर्लक्ष होऊ लागले. 'फॅशन'च्या नावाखाली आजकाल स्त्रिया बांगड्या घालत नाहीत आणि कुंकवाच्या ठिकाणी टिकली लावतात. काहींना पाटल्या, नथ, जोडवी यांसारखे अलंकार घालणे, हा प्रतिगामीपणा वाटतो ! त्या व्यतिरिक्त बऱ्याच जणांमध्ये 'अलंकार म्हणजे ऐश्वर्याचे प्रदर्शन करण्याची वस्तू' असा चुकीचा भौतिकवादी दृष्टीकोनही रूढ झालेला आहे. 'अलंकार म्हणजे दैवी कृपा होण्यासाठी साहाय्य करणारी वस्तू', हा अध्यात्मशास्त्रीय दृष्टीकोन बिंबवण्यासाठी या ग्रंथाचे प्रयोजन केले आहे.

अलंकार परिधान केल्यामुळे ईश्वरी शक्ती आणि चैतन्य मिळते, शरिरातील काळ्या (अनिष्ट) शक्तीमध्ये घट होते, वाईट शक्तींच्या आक्रमणांपासून रक्षण होते, अलंकार घातलेल्या भागांवर 'बिंदूदाबन (ॲक्युप्रेशर)' उपाय होतात... यांसारखे अलंकारांचे महत्त्व अन् लाभ अनेक अंगांनी या ग्रंथात शास्त्रासह स्पष्ट केले आहेत. विविध धातूंपासून बनवलेल्या अलंकारांची तुलना; स्त्रिया, पुरुष आणि लहान मुले यांचे अलंकार; अलंकारांची शुद्धी इत्यादींविषयी शास्त्रीय विवेचनही यात दिले आहे. अलंकार घातल्यावर सूक्ष्मातून नेमकी काय प्रक्रिया घडते, हे सर्वसामान्य व्यक्तीला कळू

शकत नाही. हे कळण्याची क्षमता असलेल्या सनातनच्या साधकांनी केलेली ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक परीक्षणे’ आणि काढलेली ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे’, हे या ग्रंथाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. सोन्याची साखळी, सोन्याची अंगठी, सात्त्विक आणि आसुरी अलंकार इत्यादींच्या संदर्भात साधकांनी केलेले ‘सूक्ष्मातील प्रयोग’ अलंकारांकडे आध्यात्मिक दृष्टीकोनातून कसे पहायचे, हे शिकवतात.

अलंकारांचा अध्यात्मशास्त्रीय लाभ होण्यासाठी सर्व अलंकार परिधान करणे आवश्यक नसून स्वतःच्या आर्थिक स्थितीनुसार धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे मोजके अलंकार परिधान केले तरी चालते; कारण ‘अलंकार किती आणि कोणते’ यांपेक्षा ‘अलंकार परिधान करण्यामागील भाव’ महत्त्वाचा आहे. ज्यांना सोन्याचे अलंकार घालणे शक्य नाही, त्यांनी सोन्याचा मुलामा दिलेले किंवा चांदीचे अलंकार किंवा तसा एकतरी अलंकार घालावा. ईश्वरप्राप्तीसाठीच्या एकूण साधनेच्या दृष्टीने नामजप, सत्सेवा आदी साधनाप्रकारांतून होणाऱ्या लाभाच्या तुलनेत अलंकारांमुळे होणारा लाभ अत्यल्प आहे. असे जरी असले, तरी साधना न करणाऱ्यांना किंवा प्राथमिक अवस्थेतील साधकांना सात्त्विकता वाढवण्याच्या दृष्टीने अलंकार वरदानच ठरतात.

हा ग्रंथ वाचून अलंकारांकडे पहाण्याचा आध्यात्मिक दृष्टीकोन सर्वांमध्ये निर्माण व्हावा आणि अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानता लक्षात यावी, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना !

– **संकलक.**